# अचलपूर नगर परिषद, अचलपूर

## जिल्हा - अमरावती

अग्निशमन विभाग :- ०७२२३-२२०१०२

जावक क्र. अनप/अग्निशमन/नाहरकत 3295 /२१. 30/8/21
दिनांक / / /२०२१

प्रति,

डॉ. डी.बी. दोड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग,
अंजनगांव रोड, परतवाडा
ता. अचलपूर, जि.अमरावती

विषय :- "तात्पुरते ना हरकत प्रमाणपत्र" बाबत.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपल्या इमारतकरिता आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांच्या पर्याप्ततेची दि. १८/०६/२०२१ रोजी अग्निशमन विभागातर्फे पाहणी करण्यात आली.

बांधकाम विभागातर्फे अग्निशमन विभागाकडे सादर केलेल्या नकाशानुसार इमारतीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | भुखंडाचे क्षेत्रफळ (चौ.मी.) | बांधकामाचे एकुण क्षेत्रफळ (चौ.मी.) | | इमारतीची उंची (मीटर) |
|---|---|---|---|---|
| 1. | | Total Built up Area | | meter |
| | | Lower Ground | | |
| | | Ground Floor | | |
| | | First Floor | | |
| | | Second Floor | | |
| | | Third Floor | | |

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने जयस्तंभ चौक, परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथे बांधण्यात आलेल्या वाणिज्यक इमारतसाठी सहा महिन्याकरिता तात्पुरते "ना हरकत प्रमाणपत्र" खालील अटींच्या व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येते.

१) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम ३ अन्वये व भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता २००५ चे सुधारणेसह अंमलबजावणी करावी.

२) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम १० अन्वये अग्निशमन उपाययोजना करण्याची जबाबदारी आपणावर राहिल.

अ.) जर अग्निशमन अधिकारी सदर इमारतीत अग्निशमन उपाययोजनाबाबत समाधानी नसेल तर इमारतीत अग्निशमनबाबत आवश्यक त्या उपाययोजना मान्यता प्राप्त संस्थेमार्फत करुन घेण्याची जबाबदारी आपणावर बंधनकारक राहिल.

ब.) आपल्या इमारतीमध्ये आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत असे प्रमाणपत्र संबंधीत मान्यता प्राप्त संस्थेमार्फत प्रमाणपत्र नमूना "अ" मध्ये व लावलेली साहित्यांची यादीसह सादर करणे आपणाला बंधनकारक राहिल.

Scanned with CamScanner

३) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता २००५ कायद्या अंतर्गत अर्जदाराने अटींची पुर्तता न केल्यास सदर इमारतीचा विकासक, मालक, भाडेकरू व भोगवटादार जो कोणी असेल, भविष्यात होणाऱ्या हानीस जवाबदार राहिल.

४) सदर इमारतीच्या ठिकाणी अग्निशमन वाहनास व दलास पोहचण्यासाठी आवश्यक ती जागा व रस्ता असने बंधनकारक राहिल.

५) सर्व आवश्यक ते अग्निशमन प्रतिबंधात्मक साहित्य जसे की, अग्निशमन यंत्र (ABC type Fire Extinguisher), Fire bucket, Hose reel ISI mark दर्जाचे असणे बंधनकारक राहिल.

६) सर्व अग्निशमन प्रतिबंधात्मक साहित्य हे सुस्थितीत तसेच तात्काळ उपलब्ध होईल अशा ठिकाणी ठेवणे बंधनकारक राहिल.

७) आपातकालीन दुरध्वनी क्रमांक जसे Police-100, Fire-101, Ambulance-102, 108 संबंधीत विभागाच्या दर्शनिभागामध्ये तसेच दक्षता कक्ष व प्राधिकरणाच्या इ.भागात लावणे बंधनकारक राहिल.

८) सदर इमारतीमधील प्रत्येक कर्मचारी हा अग्निशमन प्रतिबंधात्मक साहित्य हाताळण्यामध्ये प्रशिक्षक असणे बंधनकारक राहिल.

९) अग्निशमन प्रतिबंधात्मक काळजी घेण्यासाठी अग्निशमक, फायर बकेट, नो स्मोकिंग अशा प्रकारचे बोर्ड आवश्यक त्या ठिकाणी व दर्शनी भागात लावणे बंधनकारक राहिल.

१०) सदर इमारतीमध्ये आवश्यक ती स्वच्छता बाळगणे बंधनकारक राहिल.

११) सर्व विद्युत उपकरणे, इ. विद्युत साहित्य हे अग्निअवरोधक असणे बंधनकारक राहिल.

१२) सदर इमारतीमध्ये उष्णतावर्धक काम करावयाचे असल्यास संबंधीत अधिकाऱ्याची परवानगी घेणे बंधनकारक राहिल.

१३) भविष्यामध्ये संबंधीत इमारतीमध्ये वाढ, दुरुस्ती अथवा इतर कोणताही बदल करावयाचा असल्यास त्या बाबत विभागाची परवानगी घेणे बंधनकारक राहिल.

विद्युत पुरवठा करणारे वायर स्वतंत्र नळीमधून गेलेले असले पाहिजे. सर्व नळ्या हया एकानंतर एक च्या मजल्यावर अग्निअवरोधक साहित्याने बनवलेल्या असाव्यात.

१४) विद्युत पुरवठा करणा-या नळ्यामधून पाण्याचे पाईप, टेलेफोनचे वायर, इतर फोनचे वायर, गॅस पाईप किंवा इतर कुठलेही वायर असू नये.

१५) पाण्याचे पंप, चढण्याउतरण्याचा जीना, मोकळ्या जागेमधील विद्युत पुरवठा यासाठी स्वतंत्र लाईन टाकलेली असावी. जेणेकरुन अग्निशमन सर्किटवर परिणाम होणार नाही.

१६) धोका, धुम्रपान, निषेध बोर्ड, ट्रान्स्फॉर्मर स्वीच यार्डच्या गेटवर बसविलेले असावे.

१७) सदरचे ना हरकत प्रमाणपत्र जारी केलेल्या दिनांकापासून सहा महिनेपर्यंत वैध राहील, तसेच सदरचे ना हरकत प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. तसेच तपासणीदरम्यान आढळून आलेली आग प्रतिबंधात्मक व जीवन संरक्षण उपाययोजना ही भविष्यात तशीच राहील याची दक्षता घ्यावी.

१८) सदरील ठिकाणी जर कुठल्या प्रकारची आगीची घटना घडली तर त्याची संपूर्णत: जबाबदारी दुकानदार/दवाखान्याची राहील.

Scanned with CamScanner

नकाशात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे बंधनकारक राहील.

| अ.क्र. | अग्निशमन प्रतिबंधात्मक साहित्याची उभारणी | आवश्यक त्या गरजा | तरतूदी | शेरा. |
|---|---|---|---|---|
| 1. | अग्निशामक (Portable Fire Extinguisher) | आवश्यक | आवश्यक | As per IS:2190/15683 |
| 2. | होज पाईपची गुंडाळी (Hose Reel) | आवश्यक | इमारतीच्या प्रत्येक भागात | |
| 3. | खाली येणारा (Down comer) Internal Hydrants wet riser | आवश्यक | आवश्यक. | |
| 4. | यार्ड नळखांब (Yard Hydrant or Ring Hydrant Around the Building) | आवश्यक | आवश्यक | |
| 5. | स्वयंचलीत तुषार यंत्रणा (Automatic Sprinkler System) | | | |
| 6. | हस्तचलीत सुचना यंत्रणा (Manually Operated Electric Fire alarm System) | आवश्यक | आवश्यक | |
| 7. | स्वयंचलीत तपास व भय सुचना यंत्रणा (Automatic Detection & Alarm System) | आवश्यक | आवश्यक | |
| 8. | पाणी साठविण्याची भूमीगत टाकी (Underground Static Storage Tank) | आवश्यक | आवश्यक | |
| 9. | गच्चीवरील पाण्याची टाकी (Terrace Level Tank) (Underground Tank) | आवश्यक | आवश्यक. | |
| 10. | फायर पंप (Fire Pump) | आवश्यक | आवश्यक | ४५० LPM Fire Booster Pump. |
| 11. | संकेत (Signage) | आवश्यक | आवश्यक | |
| 12. | स्वयंचलीत धुर नियंत्रण यंत्रणा (Automatic Smoke Detection System) | | | |
| 11. | चार मार्ग आगपेटी (Two way fire inlet) | आवश्यक | आवश्यक | |
| | | | | |

**सुचना भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता-२००५ च्या प्रमाणे अंतर्गत जीन्याबाबत मार्गदर्शक सुचना :**

१) अंतर्गत जीन्याजवळ कुठल्या प्रकारची गॅस पाईप लाईन असू नये.

२) जीन्याजवळ कुठल्याही प्रकारची जागा भंडार किंवा तत्सम जागा तसेच ज्वालाग्राही पदार्थ असू नयेत.

३) बाहेर पडण्यासाठीचे दिशा दर्शक बाण हे जमीनीपासून १.५ मी. इतक्या उंचीवर असावेत तसेच चमकदार (Fluorescent Paint) असावेत व ते कुठल्याही परिस्थीतीत खराब होणार नाहीत.

कार्यालय नगर परिषद अचलपूर

अग्निशमन अधिकारी,
अचलपूर नगर परिषद

Scanned with CamScanner